Exh. 1

Order
Issue suit summons to defendants

RAVINDRA RATHOD

Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.03.10 12:02:00 +0530

**को.वि. श्रीमान दिवाणी न्यायधिश साहेब, कनिष्ठ स्तर, कळमेश्वर**

नि.दि.मु.नं.        /२०२५                                दाखल ता. २५/९/२०२५

वादी :– श्रीमती लक्ष्मीबाई नत्थुजी ढोणे
वय– ७८ वर्ष, धंदा– घरकाम
रा. दहेगांव ता. कळमेश्वर जि. नागपूर

**विरूध्द**

प्रतिवादी :– १) श्री. अशोक मनिराम चनकापूरे
वय अंदाजे ६५ वर्ष, धंदा– शेती

२) श्री. पंढरी मनिराम चनकापूरे
वय अंदाजे ६३, धंदा– शेती

दोघेही रा. दहेगांव ता. कळमेश्वर जि. नागपूर

**सरस निरस वाटणी व कायम मनाई हुकूमाकरीता दावा**

वादीचा दावा येणेप्रमाणे :–

१) असे की, वादी व प्रतिवादी सख्खे भाऊ–बहीण आहेत. वादीचे वडील नामे मनिराम गोदरूजी चनकापूरे हे दिनांक ११/६/२००३ रोजी मरण पावले तर त्यांची पत्नी युमनाबाई मनिराम चनकापूरे ही दि. ९/१०/१९९९ रोजी मरण पावली. त्यांचे नावाने मौजा– आष्टीकला प.ह.नं. २९ ता. कळमेश्वर जि. नागपूर येथे शेतजमीन भुमापन क्र. १४२/१, जमा रू. २.२५, भो.व. १ ची शेतजमीन होती. त्यांचे मृत्युनंतर वारस फेरफार क्र. ४९८ नुसार दि. २/६/२००९ रोजी घेण्यात आला होता. त्यावेळी वादीचे नाव बेबीबाई असे लिहण्यात आले होते, ते दुरूस्त करण्यात आले. यानंतर या मालमत्तेला दावा मिळकत असे संबोधण्यात येईल.